## नियमीत दिवाणी दावा क्रं. १२६/२०२२ मधील नि. २७ खाली आदेश

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस-निरस मनाने वाटप व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील प्रतिवादी क्रं. २ श्री. गुलाब शंकर इंगुळकर हे दि.१८-०७-२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे सदर वादीचे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. त्याकरीता वादीनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. सदर प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर वारस रेकॉर्डवर न आणलेस वादीचे कायदेशीर हक्क डावलेले जाणार असून कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०५. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी मागील बाजुस म्हणणे दिले आहे की, योग्य ते आदेश करण्यात यावेत. तसेच प्रतिवादी क्र. ३ यांनी सुध्दा सदर अर्जावर मागील बाजुस म्हणणे दिले आहे की, सदरचा अजर् बेकायदेशीरअसून वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

०६. वादीचा अर्ज व प्रतिवादी क्र. १ व ४ तसेच प्रतिवादी क्र. ३ यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी

सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. मुळ दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. २ च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

NEHA KONDIRAM NAGARGOJE

Digitally signed by NEHA KONDIRAM NAGARGOJE
Date: 2023.07.28 15:09:27 +0530

दि.२७.०७.२०२३.
भोर

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | - | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | - | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | - | 27/07/2023 |
| Date of Sign Order/Judgment | - | 27/07/2023 |
| Order uploaded on | - | 28/07/2023 |